# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. राजेंद्र श्रीकृष्ण भट

### मु.पो. बेडशिळ (भटवाडी), ता. अंबरनाथ, जि. ठाणे



२८

- सन २००५ पासून सेंद्रिय शेती करत असून १.३१ हेक्टर क्षेत्र मालकीचे व ०.८० हेक्टर क्षेत्र करार पध्दतीने.
- आंब्याच्या ४९ वाणांची आणि काजू, कोकम, जांभूळ, आवळा, सिताफळ इत्यादी फळझाडाची लागवड.
- दरवर्षी किमान १० टन गांडूळ खत तयार करुन स्वत:च्या शेतात वापर. रासायनिक खताचा वापर न करता शेणखत, गांडूळखत व व्हर्मीवॉश, बायोडायनॅमिक कम्पोस्ट तसेच हिरवळीच्या खताचा वापर.
- आंबा व इतर फळपिकांसाठी जिवामृत आणि अमृतपाणी तयार करुन त्याचा संजीवक म्हणून वापर.
- गोमुत्र, निंबोळी अर्क, मिरची अर्क, लसून अर्क इत्यादींचा सेंद्रिय किटकनाशक म्हणून अवलंब.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री.यशवंत वंजी पवार

### मु.पो. वरसूत, ता. सिंदखेडा, जि. धुळे



२१

- एकूण ७.६३ हेक्टर क्षेत्र असून या संपूर्ण क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण.
- बायोडायनॅमिक कंपोस्ट, फास्फोकंपोस्ट, गांडूळखत यासारख्या सेंद्रिय खताची निर्मिती स्वत:च्या शेतावर करुन त्याचा पिकासाठी वापर.
- बिजप्रक्रियेसाठी ॲझोटोबॅक्टर, रायझोबियम, पी.एस.बी.(नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू ) इत्यादी जीवाणू खतांचा वापर.
- एकात्मिक किड व्यवस्थापन तंत्राचा अवलंब, त्यामध्ये आंतरपिक पध्दती, पिकांची फेरपालट, सापळा पिकांची लागवड, पक्षी थांबे फेरोमोन सापळे, लाईट ट्रॅप इत्यादी बाबींचा अवलंब.
- धान्य महोत्सवात भाग घेऊन सेंद्रिय गहू आणि इतर सेंद्रिय उत्पादनाची विक्री.
- “आशापूरी शाश्वत कृषि मंडळ, सिंदखेडा” या नावाने सेंद्रिय उत्पादन करणा-या शेतक-याचा गट निर्माण केला असून या गटामार्फत सेंद्रिय शेतीच्या प्रचार व प्रसाराचे काम.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. बापूसाहेब निवृत्ती गाडे

### मु.पो. भैरवनाथनगर (गोंधवनी), ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर



३०

- एकूण ३.८० हेक्टर जमिन असून त्यापैकी २.०० हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय पध्दतीने शेती.
- ऊस, सोयाबीन, कांदा, भूईमूग, मिरची, हरभरा, रंगीत ढोबळी मिरची ही पिके सेंद्रिय पध्दतीने.
- किडी व रोगाच्या नियंत्रणासाठी दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क, तंबाखू पावडर, अग्नीअश्र, ब्रम्हअश्र इत्यादी जैविक पध्दतींचा वापर.
- सेंद्रिय गुळ व काकवी तयार करण्याचे तंत्रज्ञान स्वतः विकसीत केले असून मालाची विक्री बचत गटामार्फत केली जाते.
- कृषि विभागाच्या उपक्रमात सहभागी होऊन सेंद्रिय शेतीबाबत शेतक-यांना मार्गदर्शन व प्रबोधन.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. सुदाम अर्जुन सरोदे

### मु.डो-हाळे, पो.को-हाळे ता. राहता, जि. अहमदनगर



३१

- एकूण ०.८१ हेक्टर इतके क्षेत्र, त्यामध्ये डाळींब या फळपिकाची लागवड.
- फेरोमन सापळे, मित्र किडी, निबोळी अर्क इ. चा वापर करुन पिक संरक्षण.
- बिज प्रक्रियेसाठी अॅझाटोबॅक्टर, पीएसबी जैविक खतांचा नियमित वापर.
- दैनिक लोकमत, सार्वमत, आकाशवाणी, पायरेन्स बाभळेश्वर, स्टार माझा इत्यादी ठिकाणी मुलाखतीव्दारे सेंद्रिय शेताचा प्रचार प्रसार करण्याचे काम.
- श्री.साईनाथ डाळींब व भाजीपाला गट स्थापन करुन त्याच्या माध्यमातून सेंद्रिय शेती तंत्रज्ञान शेतक-यांमध्ये प्रसार.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. संभाजी धोंडीराम बोराडे

### मु.पो. शेगाव, ता. जत, जि. सांगली



३२

- एकूण ३.९० हेक्टर क्षेत्र असून त्यामध्ये शाळू, मालदांडी, टोमॅटो, भाजीपाला, कारले इ. पिकाचे सेंद्रिय पध्दतीने उत्पादन.
- गावातील शेतक-यांकडून आवळा, कारले, टोमॅटो, गाजर, जांभूळ हा शेतमाल खरेदी करुन त्यावर प्रक्रिया.
- सन २०१३ मध्ये सेंद्रिय उत्पादन प्रक्रिया ते थेट ग्राहक सेवा सुरु केली.
- संजीवनी ॲलोवेरा ज्युस १०० टक्के नॅचरल प्युअर दर्जेदार व गुणवत्तापूर्ण सेंद्रिय पध्दतीने तयार केल्यामुळे जागतिक बाजारपेठेत मागणी .
- गावामध्ये गांडूळ खत निर्मिती बचतगट तयार केला असून त्या माध्यमातून गांडूळ खत निर्मिती .

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. मंगेश धर्मराज थोरात

### मु. पांगरी, पो. अंजनडोह, ता. धारुर, जि. बीड



३३

- एकूण २.४० हेक्टर जमिन असून त्यापैकी १.०० हे. क्षेत्रावर केशर आंबा, १.०० हे क्षेत्रावर भगवा डाळींब आणि ०.४० हे. क्षेत्रावर चिकू लागवड.
- किडीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, निंबोळी पावडर स्वतः तयार करुन वापरतात.
- डाळींब बागेमध्ये सोयाबीनच्या अवशेषाचे कुट, ऊसाची पाचट, गव्हाचा भुसा व कापसाच्या प-हाटया यासारख्या पिकाच्या अवशेषांचे आच्छादन.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या माध्यमातून शेतामध्ये पॅक हाऊस, शेततळे, शेडनेट हाऊस उभारणी.
- शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशूपालन व दुग्ध व्यवसाय, जनावरांपासून शेणाचा उपयोग सेंद्रिय खत निर्मितीसाठी.
- आकाशवाणीवर सेंद्रिय शेती शाळेबाबत शेतक-यांना मार्गदर्शन.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. माधवराव बापूराव अंधारे

### मु. गणेशपूर, पो. अकोला (देव), ता. जाफराबाद, जि. जालना



३४

- ५.८५ हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी ४.८० हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय शेती. २.०० हेक्टर क्षेत्रावर आंबा आणि ०.८० हेक्टर क्षेत्रावर चिकू असे एकूण २.८० हेक्टर क्षेत्राचे प्रमाणिकरण.
- बायोडायनॅमिक कंपोस्ट आणि गांडूळ खताची निर्मिती स्वतःच्या शेतावर करुन बागेसाठी वापर तसेच गोमुत्र आणि व्हर्मीवॉशचा सर्व पिकांसाठी वापर.
- पिकांसाठी बिज प्रक्रिया करुन रायझोबियम, अॅझोटोबॅक्टर पीएसबी या जीवाणू खतांचा वापर.
- ट्रायकोडर्मा, बिव्हेरीया, व्हर्टीसेलियम या जैवीक औषधांचाही वापर तसेच पिक संरक्षणासाठी दशपर्णी अर्क, निमार्क, लमीत या वनस्पतीजन्य किटकनाशकांचा वापर.
- शेती पूरक व्यवसाय म्हणून दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन व्यवसाय.
- सेंद्रिय शेती उत्पादक गट स्थापन केला असून कृषि विषयक विविध उपक्रमात भाग घेऊन सेंद्रिय शेतीबाबत शेतक-यांना मार्गदर्शन.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. बालासाहेब रघुनाथराव पांढरे

### मु. चिचोलीराव, पो. गंगापूर, ता.जि. लातूर



- वडीलोपार्जित १४ एकर जमिन असून गेल्या ११ वर्षापासून सेंद्रिय शेती.
- जमिनीच्या विकासासाठी मूलस्थानी जलसंधारण, कंपोस्टींग, आच्छादन, बांध बंदिस्ती, मिश्र पीक पध्दती, पिकांची फेरपालट यासारख्या तंत्रांचा अवलंब.
- उत्पादन वाढीसाठी शेतामध्ये शेणकाला रबडी, जिवामृत, बायोडायनॅमिक कंपोस्ट, गांडूळखत, जीवाणू संवर्धके इत्यादीचा शेतीसाठी वापर.
- लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील सेंद्रिय शेती करणा-या शेतक-यांसाठी सन २००२ मध्ये अफार्म पुणे व्यासपीठामध्ये सक्रिय सहभाग.
- सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी गांवात कृषि विज्ञान मंडळाची स्थापना करुन कृषि वाचनालयाची निर्मिती.
- कृषि विभागाने आयोजीत केलेल्या शेतीशाळेला गेल्या ५ वर्षापासून प्रवर्तक म्हणून कार्यरत.

३५

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## श्री. मधुकरराव राजाराम सरप

### मु.पो. कानेरी सरप, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला



- २.०८ हे. क्षेत्र असून जमिन विकासासाठी कंपोस्ट खत, गांडूळ खत, हिरवळीचे खताचा अवलंब.
- सुमित इंडिया ऑरगॅनिक कंपनीमार्फत सेंद्रिय शेतमालाची विक्री. सेंद्रिय शेतीस पूरक व्यवसाय म्हणून सेंद्रिय डाळी तयार करणे, बांबुपासून ताटया बनविणे, दुग्धव्यवसाय, लिंबाचे लोणचे बनवून विक्री करणे यासाठी सेंद्रिय शेती गटांची स्थापना.
- अकोला जिल्हयामध्ये सेंद्रिय शेती करणा-या शेतक-यांची शाश्वत शेती कृषि परिषद नावाच्या संघटनेची स्थापना.
- स्थानिक ग्राहकासाठी सेंद्रिय धान्य विक्री केंद्र गावातच सुरु करुन सेंद्रिय शेती प्रमाणिकरण करण्याकरीता पुढाकार.
- जमशेटजी टाटा ट्रेनिंग स्कूल व एम.एस.स्वामीनाथन रिसर्च सेंटर चेन्नई यांचेकडून राष्ट्रीय फेलोशिप प्राप्त.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१२

## डॉ. श्री. नारायण चिंधुजी लांबट

### मु.पो. चिखलापार, ता. भिवापूर, जि. नागपूर



३७

- एकूण ३.२३ हेक्टर क्षेत्र, त्यापैकी १ हेक्टर क्षेत्रावर प्रमाणिकरण.
- नियमित जवस पिक घेऊन बीजोत्पादन कार्यक्रमांतर्गत नागपूर जिल्हयात जवस या पिकाचा हिरीरीने प्रचार व प्रसार.
- जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी गांडूळ खत प्रकल्प उभारुन नाडेफमधील खत, कंपोस्ट खत, बायोडायनॅमिक खत, शेणखत, सुक्ष्म मूलद्रव्याचा वापर, जैविक खते, माती परिक्षण इत्यादी तंत्रज्ञानाचा वापर.
- जमिनीचे आरोग्य तपासणी करुन पिकाचे नियोजन व खताचा वापर.
- शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय करुन अधिक उत्पादन.
- भिवापूर तालुका आदर्श शेतकरी पुरस्कार तसेच नागपूर जिल्हा परिषदेकडील प्रगतीशील शेतकरी पुरस्काराने सन २००४ मध्ये सन्मानित.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती संस्था) २०१२

## श्री. स्वामी समर्थ कृषि विकास व संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक

### प्रमुख विश्वस्त श्री.श्रीराम खंडेराव मोरे



- मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये या संस्थेची स्थापना करण्यात आलेली असून संस्थेची एकूण ४.४८ हेक्टर शेती. संपूर्ण क्षेत्राचे सेंद्रिय शेती प्रमाणिकरण.
- सेंद्रिय उत्पादन घेण्यासाठी गांडूळ खत, बिजामृत, अमृतपाणी, किड व रोग नियंत्रणासाठी निंबोळी अर्क, गोमुत्र, ट्रायकोडर्मा, बिव्हेरीया इत्यादी वनस्पतीजन्य व जैविक घटकांचा वापर.
- संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे संस्थेचे कार्यक्षेत्र असून १२ वर्षांपासून सेंद्रिय शेती. सेंद्रिय कृषि उत्पादन दिंडोरी प्रणित सात्विक कृषिधन या ब्रँडने विक्री.